ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI

महिला तक्रार निवारण समिती
सभा वृत्तांत - 1

Rajdhani PAGE NO. DATE / /

सोमवार दि 07/03/2022 रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता प्राचार्य कक्षामध्ये 'महिला तक्रार निवारण समिती' ची सभा अध्यक्षा प्रा. डॉ. पी. एस. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर सभेसाठी खालील सदस्य उपस्थित होते.

प्रा. डॉ. देसाई पी. एस.
प्रा. डॉ. मोरे एम. एन.
श्रीमती डुरे ए. के. — AKDare
अँड. मोरे ए. एस. — ASmore
प्रा. डॉ. शेळके आर. के.
श्रीमती पाटील एस. एस. — SSPatil
कु. हिलगे जे. डी. — DHilage
कु. गुरव ए. ए. — AGurav

वरील सर्व सदस्यांच्या उपस्थिती नंतर समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. देसाई पी. एस. मॅडमनी सर्वांचे स्वागत केले. मॅडमनी सर्वांच्या उपस्थितीत खालील विषयावर सभेमध्ये चर्चा करण्याबाबत सूचीत केले. व चर्चा सुरु झाली.

विषय क्र - 1 -

महाविद्यालयातील महिला प्रशिक्षणार्थींना समितीच्या कार्याबाबत माहिती देणे.

महाविद्यालयातील नव्याने प्रवेशित सर्व महिला प्रशिक्षणार्थींना महिला तक्रार निवारण समितीच्या कार्याची माहिती देणे आवश्यक आहे. तसेच महिलांना येणाऱ्या समस्यांविषयी जागरुक होणे गरजेचे आहे याबर सर्वांचे एकमत झाले व ही माहिती अँड. मोरे मॅडमनी द्यावी यावर सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. मोरे मॅडमनी तो मान्य केला.

विषय क्र. - 2 महिला सुरक्षा सुविधा व कायदे याबाबत चर्चा व मार्गदर्शन

महाविद्यालयातील मुलींना एस.टी. प्रवास व इतर ठिकाणी येणाऱ्या समस्या, अडचणी प्रवासात मूलांकडून जर त्रास होत असेल तर अशावेळी असणारे कायदे, सुविधा याविषयी असणारे 'प्रतिसाद Software' याची सर्व माहिती अँड. मोरे मॅडम यांनी द्यावी अशी त्यांना विनंती करण्यात आली व त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली.

अशाप्रकारे सर्वानुमते चर्चा व मार्गदर्शनानंतर ठराव मंजूर करण्यात आला.

सूचक
प्रा. डॉ. मोरे एम. एन.

अनुमोदक
प्रा. डॉ. देसाई पी. एस.

वरीलप्रमाणे सभेमध्ये सर्व विषयावर चर्चा झाली. शेवटी प्रा. डॉ. मोरे मॅडम यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले व अध्यक्षाच्या परवानगीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

प्राचार्य

प्राचार्य,
आचार्य जांभेकर शि. व. मास्तर महाविद्यालय
गारगोटी, जि. कोल्हापूर

महिला तक्रार निवारण समिती

सभा नोटीस क्र - 2

Rajdhani
PAGE NO.
DATE 1/10/2022

आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी येथे शुक्रवार दि 6/10/2022 रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता प्राचार्य कक्षामध्ये 'महिला तक्रार निवारण' समितीची सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा घेण्यात येणार आहे तरी सर्व सदस्यांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे.

सभेपुढील विषय

1. मागील सभेचे प्रोसेडींग वाचून कायम करणे
2. महिला प्रशिक्षणार्थींच्या युनिफॉर्मबाबत चर्चा
3. मुलींसाठी आरोग्य शिबीर घेणेबाबत
4. वसतीगृहातील व बाहेर रूम घेवुन राहणाऱ्या मुलींना मार्गदर्शन

प्रा. डॉ. देसाई पी. एस. — अध्यक्षा
श्रीमती डुरे ए. के. — स्वयंसेवी सदस्य
अॅड. मोरे ए. एस. — वकील -
प्रा. डॉ. शेळके आर. के. — सदस्य
श्रीमती पाटील एस. एस. — सदस्या-
कु. हिलगे जे. डी. — विद्यार्थीनी प्रतिनिधी
कु. गुरव ए. ए. — विद्यार्थीनी प्रतिनिधी

प्राचार्य
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय
गारगोटी, जि. कोल्हापूर

10 PM

ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI.

महिला तक्रार निवारण समिती
सभा वृत्तांत - 2

शुक्रवार दि. 06/10/2022 रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता प्राचार्य कक्षामध्ये 'महिला तक्रार निवारण' समितीची सभा अध्यक्षा प्रा. डॉ. देसाई पी. एस. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर सभेसाठी खालील सदस्य उपस्थित होते.

प्रा. डॉ. देसाई पी. एस.
श्रीमती डुरे ए. के. Dure
अँड मोरे ए. एस. Asmore
प्रा. डॉ. शेळके आर. के.
श्रीमती पाटील एस. एस. S S Patil
कु. हिलगे जे. डी. - J Hilage
कु. गुरव ए. ए. - A Gurav

वरील सदस्यांच्या उपस्थितीत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

विषय क्र. 1 मागील सभेचे प्रोसेडींग वाचून कायम करणे

सर्वप्रथम मागील सभेचे प्रोसेडींग वाचून कायम करण्यात आले व त्यानंतर इतर विषयांवर चर्चा करण्यात आली.

विषय क्र - 2 महिला प्रशिक्षणार्थींच्या युनिफॉर्म बाबत चर्चा (साडी)

महाविद्यालयातील महिला प्रशिक्षणार्थींना जो युनिफॉर्म देण्यात आला आहे. तो घालून साडी परिधान करून प्रवास करणे अडचणीचे होते. म्हणून साडी बरोबरच इतरा एक सलवार कमीज असा युनिफॉर्म करावा यावर चर्चा करण्यात आली.

सूचक
कु. हिलगे जे. डी.

अनुमोदक
प्रा. डॉ. देसाई पी. एस.

ACHARYA JAWADEKAR INSTITUTE OF EDUCATION GARGOTI.

Rajdhani
PAGE NO.
DATE / /

विषय क्र-3 मुलींसाठी आरोग्य शिबीर घेणेबाबत आरोग्याबाबत मुलींना मार्गदर्शन मिळावे यासाठी एका स्त्री डॉक्टरचे व्याख्यान आयोजित करावे अशी मागणी विद्यार्थिनी सदस्यांनी केली. समितीद्वारा व्याख्यानाचे आयोजन करण्याची जबाबदारी प्रा. डॉ. देसाई मॅडम यांचेवर सोपवण्यात आली.

सूचक
कु. गुरव ए. ए.

अनुमोदक
प्रा. डॉ. शेळके आर. के.

विषय क्र. 4 - वसतीगृहातील व बाहेर रूम घेऊन राहणाऱ्या मुलींना मार्गदर्शन महाविद्यालयातील वसतीगृहात राहणाऱ्या व बाहेर रूम घेऊन राहणाऱ्या मुलींना असणाऱ्या समस्यांबाबत श्रीमती डुरे मॅडम यांनी मार्गदर्शन करावे. मुलींना कायदेविषयक तसेच स्वसंरक्षण विषयक माहिती द्यावी. असे सूचित करण्यात आले. व डुरे मॅडमनी ती जबाबदारी स्वीकारली.

सूचक
श्रीमती पाटील एस. एस.

अनुमोदक
प्रा. डॉ. शेळके आर. के.

अशाप्रकारे सर्व विषयांवर चर्चा व मार्गदर्शनानंतर प्रा. डॉ. आर. के. शेळके सरांनी उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहीर केले.

प्राचार्य,
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय
गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

प्रा. डॉ. शेळके आर. के.